# पंडीत जवाहरलाल नेहरुंचे समाजवादाविषयी विचार

**डॉ. कांतीलाल दाजभाऊ सोनवणे**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
जगन्नाथ कडवादास शाह आदर्श महाविद्यालय,
निजामपूर- जैताणे, ता. साक्री जि.धुळे
Email : sonkanti84@gmail.com

**सारांश:** २० व्या शतकात अनेक राष्ट्रांनी समाज वादाचा कोणत्या ना कोणत्या स्वरुपात स्विकार केल्याने समाजवाद हा अत्यंत रुढ, प्रचलित असा शब्द झालेला दिसतो. १९ व्या शतकातील आत्यांविक व्यक्तीवाद, उदारमतवाद यांना विरोध करण्यासाठी जी विचारसरणी पुढे आली त्याला 'समाजवाद' असे म्हटले गेले. दारिद्रय, शोषण, विषमता दूर करुन न्यायाच्या आधारावर समाजाची पुर्नरचना करणे व मानवी जीवन सुखी करणे हे समाज वादाच्या व्यापक अर्थात अभिप्रेत आहेत. रॉबर्ट ओवेन या समाजशास्त्राने इ.स. १८२७मध्ये समाजवाद या संज्ञेचा सर्वप्रथम प्रयोग केला. माणसाचे व्यक्तीमत्व आणि वर्तन हे सामाजिक वातावरणात आकार घेते. असा विचार म्हणजे समाजवादी प्रेरणा होय. त्यातून आदर्श समाज रचनेसाठी विचारवंतांनी विचार मांडले. लोकशाही व उदारमतवाद या तत्वांवर निष्ठा असलेल्या पंडीत जवाहरलाल नेहरुंची समाजवादा बद्दल आस्था होती. आणि भारतात त्याचा पुरस्कार पंडीत नेहरुनींच केला.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, जवाहरलाल नेहरू, सामाजिक अन्याय, आर्थिक न्याय, समाजवाद

**प्रस्तावना :**

२० व्या शतकात अनेक राष्ट्रांनी समाज वादाचा कोणत्या ना कोणत्या स्वरुपात स्विकार केल्याने समाजवाद हा अत्यंत रुढ, प्रचलित असा शब्द झालेला दिसतो. १९ व्या शतकातील आत्यांविक व्यक्तीवाद, उदारमतवाद यांना विरोध करण्यासाठी जी विचारसरणी पुढे आली त्याला 'समाजवाद' असे म्हटले गेले. दारिद्रय, शोषण, विषमता दूर करुन न्यायाच्या आधारावर समाजाची पुर्नरचना करणे व मानवी जीवन सुखी करणे हे समाज वादाच्या व्यापक अर्थात अभिप्रेत आहेत. रॉबर्ट ओवेन या समाजशास्त्राने इ.स. १८२७मध्ये समाजवाद या संज्ञेचा सर्वप्रथम प्रयोग केला. माणसाचे व्यक्तीमत्व आणि वर्तन हे सामाजिक वातावरणात आकार घेते. असा विचार म्हणजे समाजवादी प्रेरणा होय. त्यातून आदर्श समाज रचनेसाठी विचारवंतांनी विचार मांडले. लोकशाही व उदारमतवाद या तत्वांवर निष्ठा असलेल्या पंडीत जवाहरलाल नेहरुंची समाजवादा बद्दल आस्था होती. आणि भारतात त्याचा पुरस्कार पंडीत नेहरुनींच केला.

भारतीय समाजात अनेक भेदाभेद व प्रगतीला मारक अशा चालीरीती, प्रथा, परंपरा, धर्म, जाती इ. होत्या. हे सर्व नाहीसे झाल्याशिवाय समाजाचा विकास होणे अशक्य आहे. हे पंडीत नेहरूजींनी हेरले होते. वर्गविरहीत व जातीविरहीत समाज व्यवस्था प्रस्थापित व्हावयास पाहिजे असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यादृष्टीने प्रथमच त्यांनी अस्पृश्यतेचा धिक्कार केला. भाषाभेद, प्रांतभेद, जातीभेद, धार्मिक भेद, त्यांनी निंदनीय मानला आणि राष्ट्राची एक भाषा म्हणून त्यांनी हिंदीचा स्विकार केला. पण त्यांचा हा प्रचार अभिन्वेषाने प्रेरीत झालेला नव्हता. हिंदू कोड बिलासारखे कायदे त्यांनी संसदेकडून मान्य करुन घेतले. समाजाच्या सर्व क्षेत्रात स्त्रियांना समान दर्जा प्राप्त होईल अशी व्यवस्था निर्माण झाली. एकंदरीत भारताची एकात्मका सामाजिक एकता यांना पोषक अशा ज्या गोष्टी आवश्यक मानण्यात आल्या त्या सर्व गोष्टीचा विचार व पाठींबा त्यांनी दिला होता.

**नेहरूंच्या लोकशाही समाजवादाची वैशिष्टे :-**

**१) संमीश्र अर्थव्यवस्था :**

पाश्चात्य देशातील भांडवल शाहीतील एका व्यक्तीची खाजगी मालकी/ खाजकी भांडवल व साम्यवाद / समाजवादातील भांडवलाचे असणारे राष्ट्रीयकरण हा कमालीचा विरोधाभास टाळण्यासाठी नेहरूंनी भारतासाठी मिश्र अर्थव्यवस्था स्विकारली. यामध्ये काही उद्योग खाजगी मालकीचे पण पिळवणूक नको म्हणून आर्थिक समता प्रस्थापित करण्याचे तत्व पंडीत नेहरूंना अभिप्रेत होते. प्रत्येकाला उत्पादनाचा न्याय्य वाटा व संपत्तीचे न्याय्य वितरण याचाही समावेश लोकशाही समाजवादात होतो. भारतामध्ये लोकशाही समाजवाद राबवण्यासाठी भांडवलदार व मजुर यांच्या संबंधात सुधारणा घडवून आणल्या उत्पादन प्रक्रियेत मजुरांना 'शेअर्स होल्डर ' म्हणून स्थान देण्यात आले. कल्याणकारी योजना राबवण्यापासून ते वस्तुचे न्याय्य वाटप करण्यापर्यंतचे आवश्यक वस्तुचा तुटवडा नको, आर्थिक स्वातंत्र्य भांडवलशाही व साम्यवादातील दोष नष्ट करण्यासाठी कल्याणकारी राज्य निर्माण करुन व्यक्तीला स्वातंत्र्यासाठी मिश्र तत्वज्ञान लोकशाही समाजवादाच्या माध्यमातून मिश्र अर्थव्यवस्थेतून भारताने नेहरूंच्या विचारानुसार स्विकारले.

**२) व्यक्तीला स्वातंत्र्यास महत्व :**

व्यक्तीचा सर्वांगीण विकास ही संकल्पना लोकशाही समाजवादात अभिप्रेत असते यासाठी सामाजिक व आर्थिक न्यायाची प्रस्थापना केली जाते. राज्याने व्यक्ती विकासाचे कार्यक्रम राबवले पाहिजेत. कारण व्यक्तीच्या विकासातच राज्याचा विकास समाविष्ठ असतो. त्यामुळे व्यक्तीला विकासाकरीता राज्याने व्यक्तीला स्वातंत्र्य व मुलभूत अधिकार द्यावेत असे नेहरुंच्या लोकशाही समाजवादात अभिप्रेत आहे. ते प्रत्येक व्यक्तीला आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी विचार अभिव्यक्ती, धर्म, उपासना, शिक्षण, स्वातंत्र्य, समता याचा आग्रह धरतात.

**३) राष्ट्रीयकरण :**

सामाजिक विषमता निर्माण होण्यास जबाबदार ही भांडवलशाही असून गरीब, श्रीमंत, मालक, मजूर, वर्ग निर्माण होतात. ही विषमता नष्ट करण्यासाठी ते आवश्यक ते महत्वाचे उद्योग राष्ट्रांच्या मालकीचे असावेत व कमी महत्वाचे उद्योग खाजगी मालकीचे असावेत, असे म्हणतात. यामुळे काही प्रमाणात समाजातील सामाजिक विषमता नष्ट होईल. पण त्या बरोबर ते खाजगी उद्योग धंद्यांवर शासन नियंत्रण शोषण व नफेखोरीस आळा घालतात.

**४) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत विरोध :**

श्रमिकांचे होणारे शोषण व सामाजिक विषमता या दोन कारणासाठी पंडीत नेहरुंनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेस विरोध केला. भांडवलशाहीत ज्या व्यक्तिच्या हाती उत्पादनाची साधणे असतात. त्याच व्यक्ती समाजात सत्ताधारी होतात. सत्ता व पैसा यांचे होणारे विक्रेंदीकरण यामुळे विषमता वाढतात. भांडवलशाहीत देशाचा विकास व उत्पादन वाढत असलेल्या त्यांच्यातील दोषांमुळे पंडीत नेहरु आपल्या लोकशाही समाजवादात भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा विरोध केला.

**५) संपत्तीचे न्याय्य वितरण :**

खाजगी संपत्ती हा घटक सामाजिक विषमता वाढवणारा असल्यामुळे खाजगी संपत्तीवर मर्यादा घालण्यात यावी असे नेहरु म्हणतात. संपत्तीचे उत्पादन न्याय्य वितरण करणे उत्पादीत वस्तुंचे योग्य वितरण केले तर विषमता निर्माण होणार नाही. यासाठी प्रत्येक व्यक्तीला विकासाची समान संधी दिली पाहिजे. ते खाजगी संपत्तीला विरोध करुन उत्पादीत संपत्तीचे न्याय्य वितरण व्हावे यांवर भर देतात त्याचा जास्त भर हा विषमते ऐवजी दारिद्रय निर्मुलनावर होता.

**६) अहिंसात्मक समाजवाद :**

नेहरूंच्या समाजवादाला हिंसा आणि शक्तीचा वापर मान्य नाही. लोकशाहीवर त्यांची श्रध्दा असल्यामुळे शांततापूर्ण मार्गानेच त्यांना समाजवाद अंमलात आणणे त्यांना इष्ट वाटत होते. संघटेने बळ हिंसेतून वाढत नसून शांततापूर्ण संघटनात्मक कृतीतून वाढत असते. यावर त्यांचा विश्वास होता समाजवाद अंमलात आणण्यासाठी सरकारने कायद्याचा वापर करावा. शक्तीचा वापर करु नये असे ते म्हणतात.

**७) अर्थ नियोजन :**

रशियाने समाजवादाचा स्विकार केला. आणि आर्थिक नियोजन करुन अल्पावधीत भरीव प्रगती केली. त्या प्रगतीचा प्रभाव हा नेहरूंवर पडला. म्हणून भारताच्या आर्थिक विकासाला नियोजना शिवाय पर्याय नाही. असे सांगुन पंचवार्षिक योजना सारखा कार्यक्रम सांगीतला.

**८) खाजगी मालमत्तेवर नियंत्रण :**

संपत्तीच्या केंद्रीकरणामुळे आर्थिक विषमता निर्माण होते. आणि मुठभर श्रीमंत राजसत्तेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करतात. म्हणून सामाजिक, राजकीय हिताच्या दृष्टीने खाजगी मालमत्तेवर निश्चित मर्यादा असली पाहिजे. परंतू खाजगी मालमत्तेला नेहरूंचा विरोध नव्हता.

**निष्कर्ष :**

पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी लोकशाहीचा समाजवादाशी मेळ घालून महत्वाची कामगिरी केली. व त्यातून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. तरीही त्यात पुर्णतः यश मिळालेले दिसत नाही. भारत २० व्या शतकात विकसीत व महासत्ता होण्याच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. मात्र हे सर्व करीत असतांना भारताला आपल्या गरजा, मर्यादा, येथे सामाजिक, आर्थिक, व राजकीय परिस्थिती तसेच भारतातील विशिष्ट प्रश्न यांच्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. कारण नेहरूंनी या प्रश्नांना प्राध्यान्य देऊन देशाचा आधुनिक पध्दतीने विकास घडवून आणण्यावर भर दिला होता. म्हणून आजच्या राज्यकर्त्यांना पंडीत नेहरूंना अभिप्रेत असलेल्या समाजवाद डोळयासमोर ठेवून राज्यकारभार आणि धोरणे आमलांत आणावी लागतील.

**संदर्भ ग्रंथ :**

१) आधुनिक भारतातील राजकीय विचार : डॉ. भा. ल. भोळे

२) समाजवाद काही समस्या :- अं.द. पुरानीक.

३) पंडीत जवाहरलाल नेहरु :- राजा मंगळवेढे.

४) आधुनिक राजकीय विचारवंत :- प्रा. अरविंद शृंगारपुरे.

५) आधुनिक भारतीय विचारवंत :- ना. य. डोळे.